www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

'पोलीस उपनिरीक्षक (अराजपत्रित) गट ब (मुख्य) परीक्षा 2017'

A

दि. 5 नोव्हेंबर, 2017

L10

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO. 110449

प्रश्नपुस्तिका–I
मराठी व इंग्रजी

वेळ : 1 ( एक ) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा–क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे ↑    ↑ शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



1. पुढील विधानापैकी **योग्य** विधान निवडा.

(a) इ, उ, ऋ याबद्दल अनुक्रमे य, व, र असे आदेश होतात त्यांना संप्रसारण म्हणतात.

(b) य, व, र, याबद्दल अनुक्रमे इ, उ, ऋ आल्यास यणादेश – (यण् + आदेश) असे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) चुकीचे आहे परंतु (b) बरोबर आहे. (2) (a) बरोबर आहे परंतु (b) चुकीचे आहे.

(3) दोन्हींही विधाने चुकीचे आहेत. (4) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

---

2. शोक, तिरस्कार, आश्चर्य, अशा मनोधर्माचा उल्लेख येतो, तेव्हा अशा शब्दाच्या शेवटी कोणते चिन्ह येते ?

(1) प्रश्नचिन्ह (2) स्वल्पविराम चिन्ह

(3) उद्गारवाचक चिन्ह (4) पूर्णविराम चिन्ह

---

3. 'धनुर्वात' ही संधी कशी सोडवली जाईल ?

(1) धनुः + वात (2) धनुर + वात (3) धनु + वात (4) धनुर् + वात

---

4. ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने प्रथम एकत्र येऊन शेवटी त्यांत एक स्वर मिसळतो त्यास ________ म्हणतात.

(1) शब्द (2) जोडाक्षर (3) संधी (4) अक्षर

---

5. पुढे काही स्वर (गट-1) आणि त्या स्वरांचा उच्चारस्थानातील मुखाचा भाग (गट-2) दिलेला आहे.

| | गट-1 | | गट-2 |
|---|---|---|---|
| (a) | ए | (i) | कंठ + तालू |
| (b) | ऊ | (ii) | ओष्ठ |
| (c) | ऋ | (iii) | मूर्धा |
| (d) | लृ | (iv) | दंत |

वरील जोड्यांच्या उत्तरासाठी **योग्य** तो पर्याय लिहा :

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



6. 'जी' या स्त्रीलिंगी सर्वनामाचा विकार होऊन सप्तमीचे विभक्तीयुक्त रूप काय होईल ?

(1) जिला, जीस/जिस (2) जिचा, जिचे, जिच्या

(3) जी (4) जीत/जित, जिच्यात

---

7. उच्चारभेदानुसार य्, व्, र्, ल् या वर्णांना काय म्हणतात ?

(1) स्वर (2) अर्धस्वर (3) अर्धव्यंजन (4) संयुक्त वर्ण

---

8. 'रस्त्याच्या बाजूने काही माणसे चालली आहेत'

या वाक्यात आलेल्या विशेषणाच्या बाबतीत कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) हे गणनावाचक संख्याविशेषण आहे. (2) हे क्रमवाचक संख्याविशेषण आहे.

(3) हे आवृत्तिवाचक संख्याविशेषण आहे. (4) हे अनिश्चित संख्याविशेषण आहे.

---

9. रचनेनुसार संयुक्त वाक्य कोणते ? **अचूक** पर्याय निवडा :

(a) ती चार वाजता, एस.टी. ने, पुण्यास, न सांगता गेली.

(b) आधी नमन गणरायाला, नंतर देवाधिदेवांना.

(c) प्रसंग कोणताही असला, तरी संतांची चित्तवृत्ती बदलत नाही.

(d) मुलांना समजून घ्या, मग बघा ती मोठ्यांचे कसे ऐकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) पर्याय बरोबर आहेत. (2) फक्त (b) व (c) पर्याय बरोबर आहेत.

(3) फक्त (b) व (d) पर्याय बरोबर आहेत. (4) फक्त (a) व (c) पर्याय बरोबर आहेत.

---

10. पालथ्या घड्यावर पाणी या म्हणीच्या समानार्थी असलेली अचूक म्हण कोणती ? **अचूक** पर्याय निवडा.

(1) कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच. (2) रात्रभर वाचली गीता कालचा गोंधळ बरा होता.

(3) शहाण्याला शब्दांचा मार. (4) गाढवाला गुळाची चव काय ?

---

11. अठरा गुणांचा खंडोबा या वाक्प्रचाराच्या विरुद्ध अर्थाचा वाक्प्रचार कोणता ? **अचूक** पर्याय निवडा.

(1) पोटाचा पाईक (2) अल्लाची गाय

(3) उफराट्या काळजाचा (4) उंटावरचा शहाणा

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~₹999~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



12. तपोबल, मनोरम, रजोगुण हे शब्द कोणत्या संधीची उदाहरणे आहेत. **अचूक** पर्याय निवडा :

(1) स्वरसंधी (2) व्यंजनसंधी (3) विसर्गसंधी (4) पूर्णसंधी

---

13. य्, र्, ल्, व् यांची उच्चारस्थाने अनुक्रमे ________ या स्वरांच्या उच्चारस्थानांसारखी आहेत.

(1) इ, ऊ, ऋ, ऌ (2) ई, उ, ऋ, ऌ (3) इ, उ, ऋ, ऌ (4) ई, ऊ, ऋ, ऌ

---

14. मराठी शब्दातील अन्त (शेवटचा वर्ण) 'अ' हा निभृत म्हणजे अर्धवट किंवा अपूर्ण उच्चारला जातो. याप्रमाणे कोणता शब्द योग्य **नाही** ?

(1) पान (2) जवळ (3) कपाट (4) करवत

---

15. खालीलपैकी 'शुद्ध शब्दयोगी' अव्यय ओळखा :

(1) देवळाच्या बाहेर (2) वृक्षाखाली (3) शहरोशहरी (4) गायसुद्धा

---

16. स्वर्गवास, पोटशूळ, पाणकोंबडा, घरधंदा, कलाकुशल या सामासिक शब्दांचा समास कोणता ?

(1) अलुक् तत्पुरुष (2) उपपद तत्पुरुष (3) सप्तमी तत्पुरुष (4) चतुर्थी तत्पुरुष

---

17. पुढील विधाने वाचा :

(a) गंगा, सिंधू, तापी ही नद्यांची नावे विशेषनामे आहेत. परंतु नदी हे सामान्यनाम असून जातीवाचक आहे.

(b) स्वाधीन, हिमांशू, लक्ष्मण ही मुलांची नावे विशेषनामे नाहीत. परंतु मुलगा हे सामान्यनाम असून ते व्यक्तिवाचक आहे.

(c) सामान्यनामाचे अनेकवचन होत नाही.

(d) विशेषनामाचे अनेकवचन होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) व (b) चूक (2) विधान (b), (c), (d) चूक

(3) सर्व बरोबर (4) फक्त (a) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



18. मराठी उपसर्ग नसलेला गट कोणता ?

(a) अ, अन्, आड, अद
(b) अव, नि, पड, फट
(c) अनु, अप, अभि, निर
(d) भर, अ, नि, अद

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b)
(2) फक्त (c)
(3) फक्त (d)
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

19. 'स्वरादी' संदर्भात **योग्य** विधान ओळखा :

(1) स्वरादी म्हणजे नुसते सूर होय
(2) अंगण या शब्दात अ + विसर्ग = अं
(3) दुःख या शब्दात द् + उ + विसर्ग = दुः
(4) 'किंकर' या शब्दात क् + ई + अनुस्वार = कीं

---

20. 'पुढारी' या शब्दाचा विरुद्ध अर्थ असलेला शब्द वापरुन बनविलेले अचूक वाक्य कोणते ?

(1) सामान्य नागरिकांना न्याय मिळत नाही.
(2) आजकाल नेते खूप आश्वासने देतात.
(3) त्यांचे अनुयायी खूप मोठ्या संख्येत आहेत.
(4) भक्त लोकांची रांग लागते.

---

21. त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला. या वाक्यातील उद्देश्य विस्तार कोणता ?

(a) त्याचा धाकटा
(b) मुलगा
(c) क्रिकेटच्या सामन्यात
(d) चांगला खेळला

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (a) व (c) अचूक आहेत.
(2) पर्याय फक्त (a) अचूक आहे.
(3) पर्याय (b) व (d) अचूक आहेत.
(4) पर्याय फक्त (c) अचूक आहे.

---

22. 'कोल्हा' या शब्दातून कोणता लक्षार्थ घेतला जातो. **अचूक** पर्याय सांगा :

(1) जंगलातील धूर्त प्राणी
(2) माळ्याचा मका खाणारा
(3) माणसाचा धूर्त, लबाड स्वभाव
(4) कोल्हा एक जंगली प्राणी आहे

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**23.** विशेषणसाधित क्रियाविशेषण असलेले वाक्य कोणते ? **अचूक** पर्याय निवडा.

(a) सुनिलला हजारदा सांगून झाले.

(b) दिवसा सुनिल इकडेच असतो.

(c) सुनिल उभ्या उभ्या येऊन गेला.

(d) सुनिलला एकवार सांगून पाहावे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (a) व (b) बरोबर आहेत.

(2) पर्याय (a) व (c) बरोबर आहेत.

(3) पर्याय (b) व (d) बरोबर आहेत.

(4) पर्याय (a) व (d) बरोबर आहेत.

---

**24.** 'मनकवडा' या शब्दासाठी **योग्य** शब्दसमुह असणारी अचूक वाक्यरचना कोणती ?

(1) तो दुसऱ्याच्या मनातले जाणणारा आहे.

(2) तो स्वत:च्या मनाचे बोलतो.

(3) तो दुसऱ्याच्या मनातील इच्छा पूर्ण करतो.

(4) तो दुसऱ्याला आपल्या मनातील गोष्टी सांगतो.

---

**25.** केवढी उंच इमारत ही ! या उद्‌गारार्थी वाक्याचे विधानार्थी वाक्यात वाक्य परिवर्तन कसे होईल ?

(a) ही इमारत खूप उंच आहे.

(b) ही इमारत उंचच उंच आहे.

(c) शेजारील इमारतीपेक्षा ही इमारत उंच आहे.

(d) ही तर फार उंच इमारत आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) उत्तर बरोबर आहे.

(2) फक्त (a) आणि (b) उत्तर बरोबर आहेत.

(3) फक्त (c) उत्तर बरोबर आहे.

(4) फक्त (a) आणि (d) उत्तर बरोबर आहेत.

---

**26.** खालीलपैकी कोणत्या गटातील शब्द देशी आहेत ?

(1) पगार, कोबी, हापूस

(2) विळी, चाकरी, किल्ली

(3) पोशाख, सामना, हकिकत

(4) डहाळी, ढेकूण, धोंडा

---

**27.** कापणे, मिटणे, समजणे, स्मरणे या क्रियापदांचा प्रकार कोणता ?

(1) अकर्तृक क्रियापद

(2) द्विकर्मक क्रियापद

(3) उभयविध क्रियापद

(4) सकर्मक क्रियापद

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in



**28.** पाचा मुखी परमेश्वर या म्हणीचा **योग्य** अर्थ कोणता ?

(a) पाच लोक बोलतात तेच खरे.

(b) पुष्कळ लोक जे बोलतात ते खरे.

(c) काही लोक जे बोलतात ते खरे.

(d) पंच लोक जे बोलतात ते खरे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त पर्याय (a) बरोबर आहे.

(2) फक्त पर्याय (a) आणि (b) बरोबर आहेत.

(3) फक्त पर्याय (b) बरोबर आहे.

(4) फक्त पर्याय (c) आणि (d) बरोबर आहेत.

---

**29.** आम्ही अभ्यासाला आलो, म्हणजे मग तू आम्हास ते शिकव. या वाक्यात विधेयविस्तार विभाग कोणता ?

(1) आलो, शिकव (2) अभ्यासाला, म्हणजे (3) आम्हास, आम्ही (4) म्हणजे, मग

---

**30.** 'ए' कारान्त पुल्लिंगी नामाचे 'या' कारान्त सामान्यरूप कसे होते. पुढील उदाहरणांपैकी **योग्य** उत्तर ओळखा.

(1) साने – सान्या – सान्यांनी

(2) कुत्रा – कुत्र्यास – कुत्र्या

(3) पाणी – पाण्या – पाण्याने – पाण्यांनी

(4) केळे – केळ्या – केळ्याला

---

**31.** गैर हजर, सब जज्ज, अनुकरण, सुविचार हे शब्द कोणत्या प्रकारचे आहेत ?

(1) शब्दसाधित शब्द

(2) उपसर्गसाधित शब्द

(3) अभ्यस्त शब्द

(4) सामासिक शब्द

---

**32.** जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | मोर | (i) | लांडोर |
| (b) | रेडा | (ii) | शेळी |
| (c) | बोका | (iii) | भाटी |
| (d) | बोकड | (iv) | म्हैस |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (2) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (3) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



33. राजूला भूक लागली. तो इतरांच्या आधी जेवला. या वाक्यांचे रचनेनुसार केवल वाक्यात रूपांतर कसे होईल? **योग्य** पर्याय निवडा :

(1) भूक लागल्यामुळे राजू इतरांच्या आधी जेवला.

(2) राजूला भूक लागली, म्हणून तो इतरांच्या आधी जेवला.

(3) राजू इतरांच्या आधी जेवला, कारण त्याला भूक लागली होती.

(4) राजू नेहमी भूक लागली, की इतरांच्या आधी जेवतो.

---

34. सुता, तनया, आत्मजा, नंदिनी या शब्दांसाठी **योग्य** अर्थ दर्शविणारा शब्द कोणता?

(a) माता (b) धरणी (c) लक्ष्मी (d) मुलगी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) पर्याय अचूक आहे.
(2) फक्त (b) व (c) पर्याय अचूक आहेत.
(3) फक्त (b) व (d) पर्याय अचूक आहेत.
(4) फक्त (d) पर्याय अचूक आहे.

---

35. खालील चारी जोड्या **योग्य** रीतीने जुळवून त्यातील विसंगत जोडी कोणती ते सांगा.

| | 'अ' | | 'ब' |
|---|---|---|---|
| (a) | विशेषण साधित अव्यये | (i) | अर्थात |
| (b) | नामसाधित अव्यय | (ii) | एकत्र |
| (c) | अव्ययसाधित अव्यय | (iii) | मन:पूर्वक |
| (d) | प्रत्ययसाधित अव्यय | (iv) | येथपर्यंत |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (ii), (d) (iii)
(2) (b) (i), (a) (ii)
(3) (c) (iv), (b) (i)
(4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

36. चंद्र या शब्दास समानार्थी शब्द वापरुन बनविलेली अचूक वाक्ये कोणती?

(a) इंदूचे घर आकाशी आहे.
(b) तो पहा शशी घरावर आला.
(c) अरे हिमांशू आज इकडे कुठे?
(d) आज सुधाकर उशिरा आला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (a), (b), (c), (d) सर्व चूक आहेत.

(2) पर्याय (b) व (d) अचूक आहेत. बाकी दोन्ही चूक.

(3) पर्याय (a), (b) व (c) अचूक आहेत (d) चूक.

(4) पर्याय (a), (b), (c) व (d) अचूक आहेत.

---

37. सखाराम पाटलांनी आजपर्यंत काहीही कारण नसताना तुकाराम पाटलांचे देव्हारे माजविण्याचेच काम केले आहे. या वाक्यातील वाक्प्रचाराचा संदर्भानुसार अचूक अर्थ कोणता?

(1) महत्व वाढविणे (2) संबंध वाढविणे (3) सूड उगविणे (4) भांडण लावणे

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

38. ऊठ पुरुषोत्तमा। वाट पाहे रमा।
दावी मुखचंद्रमा। सकळिकांशी।
या ओवीतील अलंकार कोणता ?

(1) उपमा (2) उत्प्रेक्षा (3) रूपक (4) व्यतिरेक

---

39. 'देवनागरी' लिपी लिहिण्याची **बरोबर** पद्धत ओळखा :

(1) 'देवनागरी' लिपी उजवीकडून डावीकडे लिहिली जाते.
(2) 'देवनागरी' लिपी अक्षरे मोडून लिहिली जाते.
(3) 'देवनागरी' लिपी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते.
(4) 'देवनागरी' लिपी एका खाली एक अशी लिहिली जात नाही.

---

40. खालीलपैकी अंशाभ्यस्त शब्द असलेला शब्दगट **अचूक** ओळखा.

(1) लाललाल, मधूनमधून, जे-जे इ. (2) शेजारीपाजारी, उरलासुरला, गोडधोड इ.
(3) कडकडाट, खदखदून, वटवट इ. (4) हालहाल, घरबीर, गडगड इ.

---

41. तद्भव शब्द असलेला अचूक शब्दांचा गट कोणता ? **योग्य** पर्याय निवडा.

(a) घास, ओठ, काम, दूध (b) सार, डबा, गुढी, तपास
(c) परंतु, ग्रंथ, नदी, कर्म (d) घर, गाव, कोवळा, घाम

**पर्यायी उत्तरे :**

(1) पर्याय (a) व (b) बरोबर आहेत. (2) पर्याय (b) व (d) बरोबर आहेत.
(3) पर्याय (a) व (d) बरोबर आहेत. (4) पर्याय (c) व (d) बरोबर आहेत.

---

42. जोड्या जुळवा :

| 'अ गट' | 'ब गट' |
|---|---|
| (a) संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यय | (i) भले |
| (b) प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यय | (ii) अगे |
| (c) विरोधीदर्शक केवलप्रयोगी अव्यय | (iii) इश्श |
| (d) तिरस्कारदर्शक केवलप्रयोगी अव्यय | (iv) हॅट |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (2) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



**43.** राम आणि लक्ष्मण यांच्यात कारण नसताना दुही माजविण्याचे काम लोक करीत आहेत. या वाक्यातील वाक्प्रचार कोणता? **अचूक** सांगा.

(a) दुही करणे (b) दुही माजणे (c) भांडण लावणे (d) मतभेद होणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) पर्याय अचूक आहे. (2) फक्त (a) आणि (c) पर्याय अचूक आहेत.
(3) फक्त (b) पर्याय अचूक आहे. (4) फक्त (a), (b) आणि (d) पर्याय अचूक आहेत.

---

**44.** मराठीतील मूळ सर्वनामापैकी लिंग व वचनाप्रमाणे बदलणाऱ्या सर्वनामांचा गट ओळखा.

(a) मी, तू, तो, हा, जो (b) मी, तू, काय, हा, जो
(c) कोण, काय, आपण, स्वत: (d) तो, कोण, मी, तू

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर
(3) (a) आणि (b) बरोबर (4) (a) आणि (c) बरोबर

---

**45.** मूळ शब्दातील अन्त्य स्वर ऱ्हस्व असला तर सामान्यरूपाच्या वेळी तो ________ होतो.

(1) ऱ्हस्व होतो (2) दीर्घ होतो
(3) दोन्ही प्रकारे लिहिता येतो (4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

**46.** मधू लाडू खात असतो. या वाक्याचे रीति भविष्यकाळी रूप कोणते?

(1) मधू लाडू खात असे. (2) मधू लाडू खात जाईल.
(3) मधूने लाडू खाल्ला असेल. (4) वरीलपैकी कोणतेही नाही.

---

**47.** 'वर' या नामाचे शब्दजाती बदलून शब्दयोगी परिवर्तन असे होईल, **अचूक** उदाहरण ओळखा.

(1) दशरथाने कैकयीला दोन वर दिले. (2) तू त्या राजपुत्राला वर.
(3) पक्षी झाडावर बसतो. (4) वरपिता मुलाच्या लग्नात तोऱ्यात वावरत होते.

---

**48.** तो नेहमी उशिरा येऊन झटपट काम करतो या वाक्यातील क्रियाविशेषण व प्रकार कोणता?

(a) नेहमी – सातत्यदर्शक क्रियाविशेषण (b) उशिरा – कालवाचक क्रियाविशेषण
(c) झटपट – रीतिवाचक क्रियाविशेषण (d) काम – गतिवाचक क्रियाविशेषण

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) पर्याय अचूक आहे. (2) फक्त (a) व (b) पर्याय अचूक आहेत.
(3) फक्त (a) व (c) पर्याय अचूक आहेत. (4) फक्त (b) व (d) पर्याय अचूक आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**49.** अनुरूप, अनुसार, यासारखे शब्द जोडताना मागील शब्दाचे सामान्यरूप होऊन मग ________ संधी होतो.

(1) पूर्वरूप (2) पररूप (3) नवरूप (4) अनुरूप

**50.** **योग्य** विधान ओळखा.

(1) उपसर्गघटित, प्रत्ययघटित, अभ्यस्त, सामासिक शब्द हे सिद्ध शब्दाचे प्रकार आहेत.

(2) उपसर्ग स्वतंत्रपणे वापरता येतात.

(3) पूर्णाभ्यस्त शब्द, अंशाभ्यस्त शब्द, अनुकरणवाचक शब्द हे अभ्यस्त शब्दाचे प्रकार आहेत.

(4) उपसर्गाचा क्वचित, स्वतंत्रपणे उपयोग होतो.

**51.** खालील शब्दसमूह अचूक शब्दाने पूर्ण करा.

माणसांचा जमाव तसे सैनिकांचे ________.

(1) पथक (2) तुकडी (3) पलटण (4) तिन्ही बरोबर

**52.** व्याकरणातील 'लिंग' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?

(1) खुन (2) खून (3) खूण (4) खुण

**53.** हे रमेशचे अक्षर चांगले आहे का ? या वाक्याचे रूपांतर उद्‌गारार्थी वाक्यात कसे होईल ?

(1) हे रमेशचे अक्षर आहे ! (2) हे रमेशचे अक्षर !

(3) काय अक्षर हे रमेशचे ! (4) हे अक्षर रमेशचे !

**54.** पासून व पलीकडे या शब्दयोगी अव्ययांचा उपयोग कोणत्या विभक्ती कार्यासाठी केला आहे ? **अचूक** पर्याय निवडा.

(1) पंचमी व सप्तमी (2) द्वितीय चतुर्थी व पंचमी

(3) तृतीय व षष्ठी (4) संबोधन व द्वितीया

**55.** पुढील विधान वाचा.

प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली वाक्ये ही संयुक्त वाक्य असतात; तर गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययानी - जोडलेली वाक्ये ही मिश्रवाक्य असतात.

(1) पूर्वार्ध बरोबर (2) उत्तरार्ध बरोबर

(3) संपूर्ण विधान बरोबर (4) संपूर्ण विधान चूक

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



**खालील उतारा वाचून त्या खालील प्र.क्र. 56 ते 60 ची उत्तरे लिहा :**

भारतीय समाजजीवनाचे विश्लेषण करताना पूर्वपरंपरा, आजचे वास्तव आणि जनमानस या तिन्ही गोष्टी एकवटून विचारात घेतल्या पाहिजेत. आपल्या परंपरेत व्यापक व सुसंघटित अशा सामाजिक एकात्मतेच्या जाणिवेचा अभाव आहे. बहुविध बाह्य प्रवाहांना सामावून घेण्याकडे तिचा कल असल्यामुळे तिचे स्वरूप सामान्यत: छोट्या छोट्या स्वायत्त घटकांचा समुच्चय असे बनले आहे. अनेक गावांचा समुच्चय म्हणजे देश, अनेक जातींचा समुच्चय म्हणजे समाज, अनेक पंथांचा समुच्चय म्हणजे धर्म अशीच भारतीयांच्या मानसिकतेची घडण झाली आहे. त्यामुळे आपल्या देशातील सामान्य माणसाची अस्मिता ही कुटुंब, जात आणि पंथ ह्या लहान लहान घटकांशीच जखडली आहे.

'वसुधैव कुटुंबकम्', 'हे विश्वचि माझे घर' या वचनांमधून व्यक्त होणारा उदात्त भावही छोट्याशा कुल-गोतातील कौटुंबिक जिव्हाळ्यावरच आधारित आहे. जात ही तर येथील जनसामान्यांनीच नव्हे, तर मोठमोठ्या तत्त्वचिंतकांनीही निसर्गसिद्ध वा ईश्वरप्रणीत मानली होती. विवाहविधि आणि अन्नोदक व्यवहार यांवरील बारीकसारीक निर्बंधांमुळे संकुचित जातीय भावनेला विलक्षण बळकटी येत गेली. साहजिकच जातिनिरपेक्ष सामाजिक जाणिवेला आपल्या सामूहिक जीवनात नेहमीच गौण लेखले गेले. भारतात अनेक राजकीय स्थित्यंतरे झाली, साम्राज्ये उदयास आली आणि अस्ताला गेली; पण स्वयंपूर्ण गावगाड्यावर, ब्रिटिश राजवट येईपर्यंत तरी, अशा घडामोडींचा परिणाम झाला नाही. आपल्या देशात केंद्रवर्ती बलाढ्य धर्मशासन वा धर्मपीठ कधी अस्तित्वात आले नाही. त्यामुळे लहान-मोठ्या लोकसमूहांचे उपासना-स्वातंत्र्य येथे नेहमीच अबाधित राहिले. परस्परविरोधी अशा कितीतरी तत्त्वप्रणाली येथे आग्रहाने मांडल्या गेल्या. वैदिक परंपरेत तर अनेक पंथोपपंथ होतेच, पण अवैदिक परंपरेतही वारंवार विघटन होतच होते. जैन धर्मात श्वेतांबर व दिगंबर हे दोन मुख्य प्रवाह. त्यांच्या पुन्हा शाखा व उपशाखा होत्या. बौद्ध धर्मात हीनयान व महायान हे मुख्य प्रवाह. त्यांपैकी प्रत्येकाचे उपप्रवाह आहेतच. हिंदू धर्मातील शैव, वैष्णव, नाथ, शाक्त, लिंगायत हे पंथ सर्वपरिचित आहेत. कुटुंब, जात, गाव, वतन, राज्य, धर्मपंथ या सर्व संस्था आपापल्या अधिकारक्षेत्रात निर्वेधपणे वर्चस्व गाजवत होत्या. यांपैकी कुणीही दुसऱ्याच्या परंपरागत प्रभावक्षेत्रात जरासुद्धा अतिक्रमण केले नाही. त्यामुळे बहुविधता, बहुसत्ताकेंद्रे, समावेशकता आणि समन्वयदृष्टी ही भारतीय समाजाच्या भौतिक व सांस्कृतिक वास्तवाची प्रमुख लक्षणे होत असे म्हणता येईल. यातून आपल्यापुरते पाहण्याची संकुचित वृत्ती निर्माण झाली. समाजाच्या दुसऱ्या घटकावर आपत्ती आली, अन्याय झाला तरी 'मला काय त्याचे' अशी उदासीनतेची, स्वयंकेंद्रिततेची प्रवृत्ती जोपासली गेली. या काळात अनेकविध घटकांना एकत्र जोडणारा भारतीय तत्त्वाचा धागा अस्तित्वातच नव्हता असे नाही; पण तो अगदीच क्षीणबल होता आणि त्याचे भानही बहुतांशी नागर विभागातील मूठभर उच्चवर्णियांनाच काय ते होते.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**56.** भारतीय समाजात सामाजिक एकात्मतेचा अभाव आहे. असे लेखकास का वाटते ?

(1) समाज असंघटीत आहे म्हणून.

(2) समाज विविध घटक समुहांमध्ये विभागला आहे म्हणून.

(3) समाजात तत्वज्ञानी लोकांची कमतरता आहे म्हणून.

(4) ब्रिटिशांनी काहीच प्रयत्न केले नाहीत म्हणून.

---

**57.** जातिनिरपेक्ष समाज का निर्माण होऊ शकत नाही ? लेखकाचे मत काय ?

(1) समाजाची बदलण्याची मानसिकता नाही.

(2) राजकीय सत्ताधिशांचा राजकीय स्वार्थ प्रबळ आहे.

(3) कुटुंब, जात, गाव, वतन, राज्य, धर्मपंथ इ. संस्थांचे वर्चस्व होते.

(4) जातीय भावना प्रबळ होत्या.

---

**58.** भारतात विविध धर्म, पंथोपंथांची विविधता असूनही जातीयता का नष्ट झाली नाही ?

(a) प्रत्येक धर्म, पंथोपंथांचे उपासना स्वातंत्र्य अबाधित होते.

(b) कोणत्याच धर्म, पंथाने जातीयता नष्ट करण्याचा प्रयत्न केला नाही.

(c) जातीयता नष्ट करण्याचे मार्गच नव्हते.

(d) भारतीय समाजात आपल्यापुरते पाहण्याची प्रवृत्ती होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर उत्तर आहे.

(2) फक्त (a) आणि (b) बरोबर उत्तर आहेत.

(3) फक्त (b) आणि (d) बरोबर उत्तर आहेत.

(4) फक्त (d) बरोबर उत्तर आहे.

---

**59.** अनेकविध घटकांना एकत्र जोडणारा भारतीय तत्वाचा धागा कोणता असावा असे लेखकास वाटते ?

(1) सरकारी आदेश काढून समाजपरिवर्तन करणे.

(2) नागरिकत्वाचे समान हक्क व अधिकार देणे.

(3) भारतीय जनमानसाचे अंतर्मन बदलविणे.

(4) स्वकेंद्रीत मनोवृत्तीचे परिवर्तन करणे.

---

**60.** आपल्या देशातील माणसांची कोणती प्रवृत्ती सदर उताऱ्यातून लेखकाने स्पष्ट केली आहे ?

(1) उदारमतवादी प्रवृत्ती

(2) संकुचित प्रवृत्ती

(3) एकात्मतेची प्रवृत्ती

(4) मानवतावादी प्रवृत्ती

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**61.** Identify the correct sentence.

(a) I give you a prize that you will work again.

(b) I give you a prize that you may work well again.

(c) I give you a prize then you may work well again.

**Answer Options :**

(1) Only (a) (2) Only (b) (3) Only (c) (4) All the above

---

**62.** Identify the sentence/s grammatically correct :

(a) If you try, you could drive a car.

(b) If I were a king. I would help the poor.

(c) If she had worked regularly, she might have achieved her goal.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b)

(3) Only (a) and (b) (4) Only (b) and (c)

---

**63.** Choose correct option to fill in the blanks.

(a) I am not feeling __________ today.

(b) I am feeling __________ today.

**Answer Options :**

(1) much well, much better (2) very well, much better

(3) very well, very better (4) much well, very better

---

**64.** Identify the grammatically correct sentence/s.

(a) Silver is a precious metal. (b) He is studying at an university.

(c) He is going to United States. (d) He gave me advice.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (a)

(3) Only (b), (c) and (d) (4) Only (a) and (d)

---

**65.** Identify the correct sentences.

(a) John, write a thousand lines poem.

(b) John write a thousand lines poem.

(c) John writes a thousand lines poem.

(d) John doesn't write a thousand lines poem.

**Answer Options :**

(1) Only (c) and (d) are correct. (2) All (a), (b), (c) and (d) are correct.

(3) Only (a), (c) and (d) are correct. (4) All (a), (b), (c) and (d) are wrong.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



66. Choose the correct sentence :

We did not hardly have time to eat.

(1) We did not eat. (2) We didn't have time.

(3) We hardly had time to eat. (4) Hardly we did not eat on time.

---

67. Choose the correct alternative to fill in the blanks in the following sentences.

(a) The lecture was ________ boring.

(b) It is ________ a pity to cut down those trees.

**Answer Options :**

(1) fairly, rather (2) rather, fairly (3) rather, rather (4) fairly, fairly

---

68. (a) "Go now!" She ordered.

(b) Sunita carried her bag, umbrella and coat.

(c) Mr. Patil, the principal, is well organised.

Identify the sentence punctuated correctly.

**Answer Options :**

(1) All (a), (b) and (c) (2) Only (b) and (c)

(3) Only (b) (4) Only (c)

---

69. Choose correct options to fill in the blanks.

(a) I want this exercise ________ in ink.

(b) Would you like the window ________ ?

**Answer Options :**

(1) to write, to close (2) writing, closing

(3) written, closed (4) written, close

---

70. Choose the most correct sentence.

(1) I lived there for five days. (2) I left there for five days.

(3) I stayed there for five days. (4) I stopped there for five days.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



71. Match the following :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | The swan song | (i) | almost nothing |
| (b) | Next to nothing | (ii) | day-dream |
| (c) | Brown study | (iii) | excellent work |
| (d) | Yeoman's service | (iv) | last creation |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

72. Pick out the error in the sentence.

England expects / every man / to do / your duty
(a) (b) (c) (d)

**Answer Options :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

73. Select the sentence with correct word order.

(1) For sale is piano the property with carved legs of a musician.
(2) Piano with carved legs the property of a musician is for sale.
(3) The property of a musician with carved legs is piano for sale.
(4) Carved legs with the property of a musician piano is for sale.

74. Choose the correct prepositional phrases.

(a) In compliance with
(b) In lieu from
(c) With a view for

**Answer Options :**

(1) (a) only (2) (b) only
(3) (a) and (b) only (4) (b) and (c) only

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



75. Choose the prefixes expressing opposite meaning.

(a) DIS - (b) ANTE - (c) EM - (d) IN -

**Answer Options :**

(1) (a) and (b) Only (2) (a) and (d) Only

(3) (a), (b) and (c) Only (4) (b) Only

---

76. Following words are given in a jumbled form. Identify the correct alternative forming a meaningful sentence.

An advanced soul - P

I met - Q

In America - R

At a certain university - S

**Answer Options :**

(1) S R Q P (2) Q P S R (3) P Q R S (4) Q R P S

---

77. Choose the correct sentence.

(1) She wishes the car belonged to you.

(2) She wished the car belongs to you.

(3) She is wishing the car belonged to you.

(4) She wishes the car is belonging to you.

---

78. Identify the correct expressions.

(a) By Leaps and Laps

(b) Odds and Evens

(c) Kith and Keen

**Answer Options :**

(1) (c) only (2) (b) and (c) only

(3) (a), (b) and (c) (4) None of the above

---

79. The rioters <u>fell back</u> when the Police arrived.

Select the correct meaning of the phrase underlined.

(1) Agreed with (2) Quarrelled (3) Retreated (4) Went forward

---

80. Which of the words has the same meaning as CALLOUS ?

(1) Stone (2) Unkind (3) Loud (4) Suitable

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**81.** Choose the word similar in meaning to CONTAGIOUS.

(1) Congruent (2) Infectious

(3) Contemporary (4) None of the above

---

**82.** His secret connections with the smugglers have brought him <u>under a cloud</u>. Identify the correct meaning of the underlined.

(1) In confusion (2) Under suspicion

(3) Under worst situation (4) Punishment

---

**83.** Identify the sentences with same pronunciation of the word 'ROW'.

(a) He is always having rows with his wife.

(b) She won the competition three times in a row.

(c) He rowed us across the lake.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**84.** Identify the correct sentence/s.

(a) Cosmetics set up the natural grace.

(b) The factory was set up by his uncle.

(c) We should not run over money.

(d) It is your duty to stand up always for the poor.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c) (2) Only (b) and (d)

(3) Only (b) (4) Only (a), (b) and (c)

---

**85.** Which of the following is a count noun ?

(1) happiness (2) sunshine (3) mile (4) gold

---

**86.** Choose the wrong sentence.

(1) An accident was happened (2) An accident has happened

(3) An accident happened (4) An accident had happened

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



87. Choose the correct sentences.
(a) If you had come earlier, you had been sure of your berth.
(b) If he asked me, I should marry him.
(c) If we send a telegram today, we shall get a reply in two days.
**Answer Options :**
(1) (a) and (c) only (2) (b) and (c) only
(3) (c) only (4) (a), (b) and (c)

88. Identify the sentence/s which are grammatically correct.
(a) She looks charming.
(b) Gopal is senior to you by two years.
(c) He is the most ideal teacher.
(d) Little money is better than none.
**Answer Options :**
(1) Only (a), (b) and (d) (2) Only (b), (c) and (d)
(3) Only (c) and (d) (4) Only (a) and (b)

89. Choose correct Impossible conditional clause.
If they had offered me a decent salary, ________
(1) I will accept the job. (2) I would have accepted the job.
(3) I could accept the job. (4) I would had accepted the job.

90. Identify the underlined word.
<u>Hearing</u> the noise, the baby woke up.
(1) Sounds (2) Verbal words
(3) Verb nouns (4) Verbal adjective

91. Match the pairs

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | He acted *as I advised him.* | (i) | Noun clause |
| (b) | I know *that he is good boy.* | (ii) | Adjective clause |
| (c) | I know the *man who was here yesterday.* | (iii) | Adverb Clause |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) |
|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (i) | (iii) | (ii) |
| (3) | (iii) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (iii) | (i) |

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide



**92.** Select proper cohesive devices for given blanks.

Several reasons can be given for the change in the attitude of many students. ___(a)___, they fear the out break of nuclear war. ___(b)___, they are concerned over the mounting pollution, of the environment. Not enough progress, ___(c)___ has been made in reducing poverty or racial strife. And ___(d)___, feel frustrated in their attempts to influence political decisions.

(i) Secondly (ii) to begin with (iii) to conclude (iv) moreover

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (i) | (iv) | (iii) | (ii) |

---

**93.** Choose the correct option to fill in the blank.

They were ________ with amazement.

(1) Struck deaf and dumb (2) Struck deaf

(3) Struck dumb (4) Struck off

---

**94.** Choose the correct positive degree of the sentence below :

Shakespeare was the greatest English poet.

(1) All English poets were not great.

(2) Shakespeare was a great Poet.

(3) None of the poets were greater than Shakespeare.

(4) Shakespeare was greatest.

---

**95.** Which of the expressions are correctly represented ?

(a) Keep ice on something

(b) Melt the ice

(c) The tip of the iceberg

**Answer Options :**

(1) (a) only (2) (c) only

(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**Read the passage given below carefully and answer the questions no. 96 to 100.**

The plot in a dramatic or narrative work is constituted by its events and actions, as these are rendered and ordered towards achieving particular emotional and artistic effects. This description is deceptively simple, because the actions (including verbal discourse as well as physical actions) are performed by particular characters in a work, and are the means by which they exhibit their moral and dispositional qualities. Plot and character are therefore interdependent critical concepts- as Henry James has said, "What is character but the determination of incident ? What is incident but the illustration of character ?" Notice also that a plot is distinguishable from the "story"- that is, a bare synopsis of the temporal order of what happens in a work of literature. When we summarize the story in a literary work, we say that first this happens, then that, then that.... It is only when we specify how this is related to that, and in what ways all these matters are rendered, ordered, and organized so as to achieve their particular effects, that a synopsis begins to be adequate to the plot.

There are a great variety of plot forms. For example, some plots are designed to achieve tragic effects, and others to achieve the effects of comedy, romance, satire, or of some other genre. Each of these types in turn exhibits diverse plot-patterns, and may be represented in the mode either of drama or of narrative, and either in verse or in prose.

---

**96.** What is the relationship between plot and story ?

(1) They are different from each other.

(2) They are different terms for the same thing.

(3) They are mutually exclusive.

(4) Narrative is more important than them.

---

**97.** What has been said about the variety of plot forms ?

(1) There are only few plot forms.

(2) There is only one plot form in all narratives.

(3) There are many plot forms.

(4) The form of plot depends on tragic effects.

---

**98.** What does "story" express according to the passage ?

(1) Spatial order

(2) Temporal order

(3) Temporary order

(4) Emotional effects

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



99. Match the following :

| | (I) | | (II) |
|---|---|---|---|
| (a) | Plot | (i) | Moral qualities |
| (b) | Actions | (ii) | Synopsis |
| (c) | Story | (iii) | Artistic effect |
| (d) | Plot and character | (iv) | Critical concepts |

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

---

100. Which of the following cannot be related to Henry James ?

(a) Character is the determination of incident.

(b) Characters wear colourful clothes in literary works.

(c) Incident is the illustration of character.

(d) Plot is distinguishable from the story.

**Answer Options :**

(1) (a) and (b) only
(2) (b) and (d) only
(3) (a), (b) and (c) only
(4) (a), (c) and (d) only

---

- o 0 o -

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

www.prepp.in

Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams | 1 Year Full Access | 50,000+ Mock tests | 10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER



**सूचना** — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

Prepp
Your Personal Exams Guide

**परीक्षेचे नांव : पोलीस उपनिरीक्षक अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा -2017** **परीक्षेचा दिनांक : 5 नोव्हेंबर, 2017**

**विषय : मराठी व इंग्रजी** (पेपर I)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत "पोलीस उप निरीक्षक" (अराजपत्रित) गट-ब (मुख्य) परीक्षा-2017 " या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण / संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने उत्तरतालिका सुधारित केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका - KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 3 | 3 | 1 | 1 |
| 2 | 3 | 4 | 2 | 3 |
| 3 | 1 | 1 | 3 | 2 |
| 4 | 2 | 4 | 2 | 1 |
| 5 | 1 | 1 | 3 | 4 |
| 6 | 4 | 2 | 4 | 3 |
| 7 | 2 | 3 | 3 | 3 |
| 8 | 4 | 3 | 3 | 3 |
| 9 | 3 | **1** | 1 | 1 |
| 10 | 1 | 3 | 3 | 2 |
| 11 | 2 | 3 | 3 | 3 |
| 12 | 3 | 3 | 4 | 4 |
| 13 | 3 | 1 | 3 | 4 |
| 14 | 4 | 2 | 3 | 4 |
| 15 | 4 | 1 | 3 | 3 |
| 16 | **3** | 4 | 1 | 3 |
| 17 | 2 | 2 | 3 | 3 |
| 18 | 2 | 3 | 2 | 1 |
| 19 | 3 | 1 | 1 | 3 |
| 20 | 3 | 1 | 3 | 1 |
| 21 | 2 | 3 | 3 | 2 |
| 22 | 3 | 2 | 3 | 3 |
| 23 | 4 | 3 | 1 | 3 |
| 24 | 1 | 1 | 3 | 3 |
| 25 | 1 | 4 | 2 | 1 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 26 | 4 | 3 | 2 | 4 |
| 27 | 3 | 4 | 3 | 1 |
| 28 | 3 | 1 | 4 | 3 |
| 29 | 4 | 1 | 3 | 3 |
| 30 | 1 | 3 | 1 | 3 |
| 31 | 2 | 2 | 4 | 1 |
| 32 | 1 | 3 | 1 | 2 |
| 33 | 1 | 2 | 4 | 2 |
| 34 | 4 | 4 | 4 | 2 |
| 35 | 4 | 3 | 1 | 1 |
| 36 | 4 | 1 | 3 | 1 |
| 37 | 1 | 1 | 3 | 3 |
| 38 | 3 | 3 | 4 | 4 |
| 39 | 3 | 2 | 2 | 2 |
| 40 | 2 | 3 | 4 | 4 |
| 41 | 3 | 4 | 1 | 3 |
| 42 | 1 | 2 | 4 | 2 |
| 43 | 3 | 4 | 1 | 3 |
| 44 | 1 | 4 | 2 | 2 |
| 45 | 2 | 1 | **1** | 1 |
| 46 | 2 | 3 | 3 | 4 |
| 47 | 3 | 3 | 2 | 3 |
| 48 | 3 | 4 | 4 | 4 |
| 49 | **1** | **3** | **3** | 4 |
| 50 | 3 | 3 | 4 | 1 |

9th Jan, 2018

Prepp+ Subscription
Only ~~(₹999)~~ ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER

(पेपर I)

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 4 | 3 | 3 | 4 |
| 52 | 3 | 2 | 2 | 1 |
| 53 | 3 | 2 | 1 | 3 |
| 54 | 1 | 3 | 2 | 2 |
| 55 | 3 | 4 | 1 | 3 |
| 56 | 2 | 2 | 3 | 2 |
| 57 | 3 | 4 | 2 | 3 |
| 58 | 1 | 2 | 4 | 2 |
| 59 | 4 | 3 | 2 | 4 |
| 60 | 2 | 1 | 1 | 1 |
| 61 | 2 | 2 | 2 | 2 |
| 62 | 4 | 3 | 4 | 2 |
| 63 | 2 | 2 | 2 | 3 |
| 64 | 4 | 4 | 3 | 1 |
| 65 | 3 | 1 | 2 | 2 |
| 66 | 3 | 2 | 3 | 1 |
| 67 | 3 | 3 | 3 | 1 |
| 68 | 1 | 4 | 3 | 1 |
| 69 | 3 | 3 | 2 | 4 |
| 70 | 3 | 4 | 2 | 3 |
| 71 | 1 | 2 | 2 | 3 |
| 72 | 4 | 4 | 2 | 2 |
| 73 | 2 | 3 | 2 | 4 |
| 74 | 1 | 2 | 1 | 2 |
| 75 | 2 | 3 | 3 | 2 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 1 | 1 | 1 | 2 |
| 77 | 1 | 2 | 1 | 2 |
| 78 | 4 | 3 | 3 | 3 |
| 79 | 3 | 2 | 2 | 1 |
| 80 | 2 | 2 | 4 | 2 |
| 81 | 2 | 2 | 1 | 3 |
| 82 | 2 | 3 | 2 | 4 |
| 83 | 3 | 3 | 2 | 3 |
| 84 | 2 | 2 | 4 | 2 |
| 85 | 3 | 1 | 3 | 3 |
| 86 | 1 | 4 | 1 | 3 |
| 87 | 2 | 1 | 3 | 3 |
| 88 | 4 | 2 | 3 | 2 |
| 89 | 2 | 3 | 2 | 4 |
| 90 | 4 | 2 | 4 | 4 |
| 91 | 3 | 4 | 4 | 3 |
| 92 | 3 | 1 | 1 | 3 |
| 93 | 3 | 1 | 3 | 2 |
| 94 | 2 | 3 | 3 | 4 |
| 95 | 2 | 3 | 4 | 1 |
| 96 | 1 | 2 | 2 | 2 |
| 97 | 3 | 2 | 1 | 2 |
| 98 | 2 | 1 | 2 | 2 |
| 99 | 2 | 2 | 2 | 1 |
| 100 | 2 | 3 | 3 | 3 |



Prepp+ Subscription
Only (₹999) ₹249/year
500+ Exams
1 Year Full Access
50,000+ Mock tests
10,000+ Pyp's
Unlock Your Success Today!
LIMITED TIME OFFER